# प्रेस नोट

दिनांक :- १६/०७/२०२६

आरोपी लोकसेवक श्री.मधुसुदन नामदेवराव ताजने वय ५६ वर्ष, पद-शाखा अभियंता, नेमणूक- जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग यवतमाळ, रा.विकास कॉलनी, वडगांव रोड यवतमाळ ता.जि. यवतमाळ, यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यवतमाळ, यांनी रंगेहाथ पकडलेबाबत...

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | यवतमाळ युनिट |
| पो.स्टे व गुन्हा नोंद क्रमांक व कलम | पो.स्टे.यवतमाळ शहर अप क्र. ६११/२०२६ जिल्हा यवतमाळ, कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| लोकसेवकाचे नांव व कार्यालय | आरोपी लोकसेवक श्री.मधुसुदन नामदेवराव ताजणे वय ५६ वर्ष, पद- शाखा अभियंता, नेमणूक - जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग यवतमाळ, वर्ग-३ (बांधकाम विभाग) |
| मागितलेली लाचेची रक्कम | तडजोडीअंती १०,००० रु |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,००० /- रुपये |
| थोडक्यात हकिकत | तक्रारदार यांनी समक्ष येवुन तक्रार दिली की, तक्रारदार हे शासकीय ठेकेदार म्हणुन शासनाच्या शासकीय विभागांची कामे करतात. तक्रारदार यांना जिल्हा परिषद प्रशासकिय ईमारत परिसर यांत्रीकी विभागाचे बाजुला पार्किंग शेडचे बांधकाम करणे व पार्किंग व्यवस्था करणे अशी दोन कामे ऑनलाईन निविदेद्वारे मिळालेली होती. सदर दोन्ही कामाचे बाकी असलेले अंतिम देयक प्राप्त होणेकरिता तसेच दोन्ही कामाचे एम.बी वर सही करुन कामाचे पुर्णत्व प्रमाणपत्र (सिसि) देण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग येथील नेमणुकीस असलेले शाखा अभियंता श्री. मधुसुदन ताजणे यांनी २५०००रु लाचेची मागणी केल्याची तक्रार दिली.<br>तक्रारीचे अनुषंगाने पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आलोसे श्री. मधुसुदन ताजने, शाखा अभियंता यांनी सदर दोन्ही कामाचे मोजमाप पुस्तीका वर सही करुन कामाचे पुर्णत्व प्रमाणपत्र(सिसि) देण्याकरिता पडताळणी कारवाई दरम्यान तडजोडीअंती १०००० रु. पंचासमक्ष लाच मागणी करुन सापळा कारवाई दरम्यान लाच रक्कम १००००रु जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग यवतमाळ येथे स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडून सदरचा गुन्हा नोंद करण्यात आला. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,यवतमाळ तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ, दगडी इमारत, टांगा चौक यवतमाळ

संकेत स्थळ :- dyspacbyavatmal@mahapolice.gov.in

टोल फ्री क्रमांक :- १०६४ दुरध्वनी क्रमांक :- ०७२३२- २४४००२/८९७५७९१०६४

श्री. अभय आष्टेकर, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. यवतमाळ मो.नं. ८२७५०८८७९७

श्री.अर्जुन घनवट,पोलीस निरीक्षक ,ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.९६२३१०१७०६

श्री.मनोज ओरके ,पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.यवतमाळ.मो.नं.८८५५०८०००७

(अभय आष्टेकर)

पोलीस उपअधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ